लोकसत्ता

डॉ. देविसहाय पांडेय यांना महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार देताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, शेजारी प्रो. श्रीनिवास वरखेडी, सुरेशकुमार शर्मा, जोगेंद्र कवाडे.

महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण

बैद्यनाथचे संस्थापक पं. शर्मा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजन

नागपूर, ता. ११ : श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन्सचे संस्थापक वैद्य पंडीत रामनारायण शर्मा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ रामटेक येथील कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या सहकार्याने महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी होते. यावेळी बैद्यनाथचे संचालक सुरेशकुमार शर्मा, आमदार जोगेंद्र कवाडे, बैद्यनाथचे प्रधान वैद्य रमेश शर्मा, जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे उपस्थित होते.

पुरस्कार मिळविणाऱ्यांमध्ये डॉ. देविसहाय पांडेय (अयोध्या), डॉ. कंदारडरी रामानुजाचार्य (हैदराबाद), आमदार मणिशास्त्री द्रविड (चेन्नई) यांचा समावेश आहे. त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये रोख आणि गौरवपत्र देण्यात आले.

डॉ. देविसहाय पांडेय हे दीप या उपनामाने परिचित आहेत. अयोध्या फैजाबाद येथील ते रहिवासी असून ते वेदज्ञ व दर्शनशास्त्राचे साहित्यिक आहेत. त्यांच्या संपूर्ण जीवनाचे तपस्याभूत, असे चारही वेदांवर भाष्य त्यांनी लिहिले आहेत. चौखम्बा प्रकाशनातर्फे ते लवकरच प्रकाशित होत आहेत. त्यांच्या सांख्याकारिका, उपनिषदे, भगद्गीता आदी विविध ग्रंथाचे अध्यापन व विविध ३० ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

प्रो. रामानुजाचार्य हे वेदांत, व्याकरण, न्यास आणि साहित्यशास्त्राचे गाढे अभ्यासक आहेत. ते राष्ट्रीय मान्यताप्राप्त संस्कृत विद्वान आहेत. त्यांचे विविध शास्त्रांवरील २० हून अधिक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. शास्त्रपांडित्यामुळे विविध गौरवदेखील त्यांना प्राप्त झालेले आहेत.

डॉ. मणिशास्त्री द्रविड हे वेदांत, मीमांसाशास्त्र, व्याकरण आणि न्यायशास्त्राचे अभ्यासक आहेत. डॉ. द्रविड हे मद्रास संस्कृत कॉलेज येथे सहयोगी प्राध्यापक आहेत. त्यांचे आतापर्यंत दहा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. याशिवाय पद्मश्री सत्यव्रत शास्त्री, महाकवी न. बा. पळसुले, पुलेला श्रीरामचंद्र, प्रा. रमारंजन मुखर्जी, प्रा. राधावल्लभ त्रिपाठी, डॉ. ई. देवनाथन, प्रो. मिथिलाप्रसाद यांना सन्मानित करण्यात आले.

प्राच्यविद्या परिषदेत गायन, काव्य आणि नृत्य याचा उत्तम संयोग अनुभवायला मिळाला.

सृजनात्मक काव्ये, नृत्यांचा संगम

म. टा. प्रतिनिधी, नागपूर — महाराष्ट्र टाइम्स

संस्कृतातील सृजनात्मक, कलात्मक अभिव्यक्तीचे दर्शन शुक्रवारी बघायला मिळाले. महाकवी कालिदासाच्या अशाच काही सृजनात्मक कलाकृतींचा नृत्याशी संगम झाला आणि अनेक देखण्या कलाकृतींचा आनंद घेता आला.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने आयोजित अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद-२०२०मध्ये या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रेशीमबागेतील सुरेश भट सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू गिरीश चंद्र, तुली हॉटेलचे व्यवस्थापकीय संचालक मोहबतसिंग तुली, कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी व साहित्य, कला विभागाच्या प्रमुख डॉ. नंदा पुरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून झाली.

मुंबईच्या डॉ. संध्या पुरेचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कवी कालिदासाच्या 'ऋतुसंहार' कलाकृतीवर आधारित भरतनाट्यम् सादर केले. या नृत्याची संकल्पना, दिग्दर्शन आणि नृत्यदिग्दर्शन डॉ. पुरेचा यांचे होते. त्यांच्यासोबत, शांती मोहन्ती दवे, चित्रा दळवी, पुष्करा देवचाके, मृणालिनी शाह, दुर्वा पाटकर, सुरभी सारकर, दामिनी नाईक, रेशमा गुधेकर, रश्मी दोशी, मधुजा गोलकर आणि शांभवी ताडबे या नृत्यांगना या नृत्यात सहभागी झाल्या होत्या. डॉ.पुरेचा व श्री शंकराचार्य विद्यापीठाचे कुलगुरू धर्मराज अडट यांचा डॉ. वरखेडी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.त्यानंतर, बेंगळुरूच्या अभिनव इन्स्टिट्युटच्या निरूपमा, राजेंद्र आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'काव्याकृती' ही नृत्यनाटिका सादर केली. कविकुलगुरू कालिदास यांच्या 'मालविकाग्निमित्रम्, 'अभिज्ञान शाकुन्तलम्, 'रघुवंशम' यांसारख्या काव्यात्मक कलाकृतींमध्ये महाभारत आणि रामायणाचे जे वर्णन आहे, त्याचा नृत्याविष्कार निरूपमा, राजेंद्र आणि त्यांचे सहकलाकार यांनी सादर केला. नृत्याची सुरुवात त्यांनी रघुवंशममधील सहा श्लोकांवर आधारित राम व सीतेच्या संवादावर आधारित नृत्याने केली. त्यानंतर त्यांनी शाकुंतलवरील नृत्य सादर केले.

त्यानंतर, नागपूरच्या संस्कृत भाषा प्रचारिणी सभा आणि स्वरसंभवद्वारा 'आम्रपाली' ही नृत्यनाटिका सादर झाली. प्रसिद्ध नर्तक दाम्पत्य किशोर आणि किशोरी हम्पीहोळी यांनी या नृत्यनाटिकेचे दिग्दर्शन केले होते.

आज महोत्सवात...

आज, शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाची माजी विद्यार्थिनी आणि गायिका मंजिरी वैद्य-अय्यर आणि त्यांचे सहकारी 'गर्जा महाराष्ट्र माझा' हा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सादर करतील. यानंतर, दोहा येथून आलेले नाट्यधर्मी 'प्रतिमा नाटकम' सादर करतील. महाकवी भास लिखित या संस्कृत नाटकाचे दिग्दर्शन एम. पी. राधाकृष्णन यांनी केले आहे. यानंतर, डॉ. विभा क्षीरसागर लिखित नाटक 'स्त्रियशचरित्रम'चे सादरीकरण करण्यात येणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन सतीश ठेंगडी यांनी केले आहे. हैदराबादच्या नृत्यांगना सात्विका पेन्ना या आंध्रनाट्यम् नृत्याच्या माध्यमातून या सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप करतील. सर्व कलाप्रेमी नागपूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक आयोजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

पांडेय, कंदाडै, रामानुजाचार्य, द्रविड यांना पुरस्कार प्रदान

नागपूर : 'कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी पं. रामनारायण शर्मा यांच्या स्मृती प्रित्यर्थ पं. रामनारायण शर्मा आयुर्वेद संशोधन प्रतिष्ठान, स्थानिक प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार प्रो. देवीसहाय पांडेय, तसेच प्रख्यात वेदांत शास्त्री पं. मणिशास्त्री द्रविड आणि व्याकरणशास्त्र पंडित प्रो. कंदाडै रामानुजाचार्य यांना प्रदान करण्यात आला.

अखिल भारतीय प्राच्यविद्या संमेलनाच्या निमित्ताने झालेल्या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, डाक विभागाचे मुख्य अधिकारी हरिश्चंद्र अग्रवाल, बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश शर्मा, रमेश शर्मा, जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक प्रशांत सवाई उपस्थित होते. ज्या विद्वानांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार आणि विकासासोबतच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा गौरव व्हावा म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यावेळी पुरस्कारकर्त्यांचा शाल, चंदनहार, सन्मानपत्र, भेटवस्तू आणि रोख पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन डॉ. रेणुका बोकार, डॉ. पराग जोशी व डॉ. दिनकर मराठे यांनी केले. तसेच यावेळी बैद्यनाथ प्रतिष्ठानचे सुरेश शर्मा यांनी तीनही पुरस्कारार्थ्यांना ५० हजारांचा निधी जाहीर केला.

तरुण भारत

अभिनव शास्त्रधारा झाली प्रवाहित

शास्त्रार्थ परिषदेचा समारोप

◆ नागपूर, ११ जानेवारी

रामटेकच्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वतीने आयोजित अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत दुसरी शास्त्रार्थ परिषद शनिवारी पार पडली.

या शास्त्रार्थाच्या अध्यक्षस्थानी मणिद्राविड शास्त्री होते, तर निरीक्षक प्रो. कोरडा सुब्रमणियम् होते. द्वैत वेदांत या विषयावर नारायण पुजारी यांनी, वेदाभ्यास या विषयावर प्रो. वीरनारायण, पांडुरंगी साहित्य या विषयावर प्रो. कोम्पेला सूर्यनारायण यांनी विचार मांडले. प्रो. रंगा रामानुजाचार्य यांनी विशिष्टाद्वैत, मीमांसा या विषयावर महेश्वरम् यांनी विचार व्यक्त केले. प्राचीन न्याय या विषयावर चंद्रशेखर जोशी आणि व्याकरण या विषयावर श्रुती के. एस. यांनी अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले. काही मुद्यांवर शास्त्रचर्चा चांगलीच रंगली

आपल्या अध्यक्षीय भाषणात मणिद्राविड शास्त्री यांनी सर्वच सहभागी वक्त्यांचे अभिनंदन केले. मर्यादित वेळेत संपूर्ण विषय सांगणे कठीण असले तरी वक्त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच दोन पुस्तकांचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. तसेच सिस्फा चित्रकला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रार्थ करताना तज्ज्ञांची रेखाचित्रे काढून त्यांना भेट दिली.

शास्त्रार्थ परिषदेचे सूत्रसंचालन प्राण शिवराम भट यांनी केले. या परिषदेला विवेकानंद विद्यापीठ, कोलकाताचे कुलगुरू आत्मप्रियानंद स्वामी व कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांची विशेष उपस्थिती होती. शास्त्रार्थाच्या माध्यमातून नवीन दृष्टिकोन समजून घेण्यासाठी अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◂ (तभा वृत्तसेवा)

देशोन्नती

महाकवी कालिदास संस्कृतव्रती पुरस्कार सोहळा

नागपूर : बैद्यनाथ आयुर्वेद भवनचे संस्थापक वैद्य पं. रामनारायण शर्मा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या सहकार्याने 'महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार' वितरण कार्यक्रम अलीकडेच झाला. यामध्ये संस्कृत भाषेचा प्रचार, प्रसार, विकास आणि संशोधनासाठी आजीवन सेवा करणाऱ्या तीन विद्वानांचा सत्कार करण्यात आला. अयोध्या येथील प्रो. देवीसहाय पांडेय, हैदराबादचे डॉ. कंदाडरी रामानुजाचार्य आणि चेन्नईचे मणिशास्त्री प्रविड अशी सत्कार करण्यात आलेल्या विद्वानांची नावे आहेत. या सर्वांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ५० हजार रुपये रोख आणि गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी, बैद्यनाथचे निदेशक सुरेशकुमार शर्मा, आमदार जोगेंद्र कवाडे, वैद्य रमेश शर्मा, नागपुरचे जिल्हाधिकारी रविंद्र ठाकरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

बैद्यनाथतर्फे महाकवि कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार सोहळा

नागपूर : श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवनचे संस्थापक पं. रामनारायण शर्मा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेकच्या सहकार्याने महाकवि कालिदास संस्कृत व्रती राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अयोध्या उत्तरप्रदेश येथील डॉ. देवीदास पाण्डेय, हैद्राबादचे डॉ. कंदाडरी, तामिळनाडु येथील मणिशास्त्री द्रविड यांना ५० हजार रोख, गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी होते. प्रमुख पाहुणे म्हणून बैद्यनाथचे संचालक सुरेशकुमार शर्मा, आमदार जोगेंद्र कवाडे, रमेश शर्मा, जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे उपस्थित होते. दीप या टोपण नावाने प्रचलित अयोध्या फैजाबाद येतील प्रो. पाण्डेय हे वेदज्ञ, दर्शनशास्त्राचे साहित्यिक आहेत. त्यांनी चारही वेदांवर भाष्य लिहिले असून ते लवकरच प्रकाशित होत आहे. त्यांचे आजपर्यंत ३० ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. प्रो. कंदाडरि रामानुजाचार्य हे वेदांत, व्याकरण, न्याय आणि साहित्यशास्त्राचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांचे विविध शास्त्रावरील २० ग्रंथ प्रकाशित झाले आहेत तर डॉ. मणिशास्त्री द्रविड हे वेदांत, मीमांसाशास्त्र, व्याकरण आणि न्यायशास्त्राचे प्रगाढ विद्वान आहेत. ते मद्रास संस्कृत कॉलेजमध्ये सहयोगी प्राध्यापक असून त्यांचे १० ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

पुण्यनगरी

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः

100th Year ★ 50th Session
NAGPUR Session ★ 10-12 Jan. 2020

Kavikulaguru Kalidas Sanskrit University

Shashtraarth Parishad, book exhibition mark Day Two of AIOC

■ Staff Reporter

THE day-two of All India Oriental Conference (AIOC) organised by Kavikulguru Kalidas Sanskrit University (KKSU) witnessed various events and activities like the 2nd Shashtraarth Parishad, book exhibition, lecture series, paper presentations and cultural programmes.

The 2nd Shashtraarth Parishad took place at Dattopanth Thengdi Hall, Smruti Mandir, Reshimbagh on Saturday in which Prof Mani Dravid Shastri presided over. Prof Korada Subrammanyam, Dr Narayana Pujar, Prof Veernarayana Pandurangi, Prof Kompella Rama Suryanarayana, Prof Ranga Ramanujacharya, Pandit Maheswaran, Dr Chandrashekhar Joshi and Shruthi KS were the expert speakers of the Parishad.

Prof Mani Shastri Dravid participating in the Shashtraarth Parishad while other experts also share the dais. (Pic by Satish Raut)

The Parishad saw intellectual discussion over innovative sciences. Prof Korda Subramaniyam was observer of the session. Dr Narayan Pujari spoke about Dwait Vedant, Prof Pandurangi discussed about studying *Vedas*, Prof Suryanarayan highlighted literature, while Prof Ramanujacharya shared his thoughts on Vishist Dwait. Pandit Maheshwaram discussed *Mimansa*. Dr Joshi spoke about ancient justice and thoughtful inputs on grammar. Some science based discussions attracted the attention of intellects present at the session.

In his presidential address, Mani Dravid Shastri congratulated all the participating speakers. He mentioned that although it was difficult illustrate whole subject in a limited time, the speakers have made sincere efforts. Also, two books were released during the Parishad. CIS-FA students made portraits of guests of the Parishad which was appreciated by all.

Prof Srinivasa Varkheedi, Vice-Chancellor of KKSU, was prominently present during the event. A large number of students and research scholars were present to understand the new perspective through the Scriptures.

AIOC's national book expo attracts book lovers

THOUSANDS of people thronged into the National Book Exhibition held on the occasion of AIOC at Reshimbagh Ground on Saturday. Kavi Kulguru Kalidas University (KKSU), Ramtek has ensured that Nagpur book lovers must get a treat of ample reading material.

Publication Department of Central Government offered handsome discounts on varieties of books, novels, etc. This was an irresistible stop for all book lovers.

Presence of renowned publication houses added varied flavours to the exhibitions as the stalls offered ample options in various category of subjects. Prasad Prakashan, Pune KKSU stall, French Institute of Pondicherry added the pinch of exclusivity to the exhibition.

The exhibition has surprised everybody by making available the rare Sanskrit books collection. The scriptures, old and new editions of prominent literatures, books of eminent writers and research based books steal the show.

Visitors can get chance to buy variety of books like Systems of Sanskrit Grammar; Raja Yoga; Meditation and Royal Path; Indian Philosophy; Mahakavya in Sanskrit, English- Sanskrit Dictionary, Gems and Astrology, Dharmashastra on Law and Ethics, Yog Vidnyan, Bhartiya Sanskruti, and Raghuvansh Mahakavyam, etc were just a few among the treasure of books that were seen at the fair.

Bagwad Gita, Durga Saptashati, Stree Sukta, Purush Sukta grabbed attraction of many visitors.

Book lovers going through the variety of books available at the National Book Exhibition at AIOC on Saturday. (Right) Some participants taking part in the drawing contest.

A cultural programme 'Garja Maharashtra Majha' was held on the 2nd day of All India Oriental Conference on Saturday.

Kalidasian's Green Team join hands to make event eco-friendly

BEING 50th session of AIOC, the KKSU has tried to make the session eco-friendly. "Green and Clean" theme is followed by all the volunteers and staffers of University making it as green team. It has made the maximum materials required for the conference in eco-friendly manner.

Prof Shrinivasa Varakhedi gave guidance and inspiration to promote, propagate for this eco-theme based conference. He has taken initiation and gave suggestion to create these Green Team under the leadership of Varada Malge who is alumni of KKSU and strive hard for environmental issues.

Kalidasian's Green Team has gone completely plastic free by replacing typical plastic items by some alternative ones. Registration kit included jute bag, paper pen, I-Card without Plastic Cover. The premises was made eco-friendly ensuring least use of plastic and other pollutants.

Single use plastics is avoided as much as possible during the whole conference. Even the cutlery is not of plastic. Alternatives are used instead.

Plastic bottles (PET) if used will be sent for recycling. This entire set of efforts are made so that the entire event remains green and clean.

Malge and her group work hard under the leadership of Prof Varakhedi, Prof Madhusudan Penna with the help of Prof K Pandey, Dr Parag Joshi, Pravin Kalambe and Jui Pandharipande to make the event eco-friendly.

TheHitavada

AIOC - MEDIA COVERAGE - 12 - 01-2020